# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.06.2026** **वारःरविवार**

---

- भारत आणि सेशेल्स दरम्यान आज द्विपक्षीय सहकार्यावर चर्चा
- आवश्यक सर्व कागदपत्रं मिळेपर्यंत कैलास मानसरोवर यात्रा सुरू न करण्याचा परराष्ट्र मंत्रालयाचा नागरिकांना सल्ला
- पंतप्रधान आज आकाशवाणीवरुन करणार मन की बात
- व्हेनेझुएलामध्ये झालेल्या भूकंपातील मृतांची संख्या 1 हजार 430 वर. किमान 68 हजार 900 लोक बेपत्ता आणि
- गोव्याचा 14 वर्षीय आंतरराष्ट्रीय मास्टर इथन वाझ ठरला भारताचा 96 वा, बुद्धिबळ ग्रँडमास्टर.

**<u>सेशेल्स</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सेशेल्सचे अध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्याशी चर्चा करतील. दोन्ही नेते द्विपक्षीय सहकार्याच्या विविध पैलूंचा आढावा घेतील आणि परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर विचार-विनिमय करतील.
सेशेल्सच्या नॅशनल असेंब्लीला आज मोदी संबोधित करणार असून तिथल्या भारतीय समुदायाच्या सदस्यांशी ते संवाद साधणार आहेत. त्यानंतर, पंतप्रधान 'रोश कैमान' इथे होणाऱ्या राष्ट्रीय दिन सोहळ्यात सहभागी होतील. या सोहळ्यात भारतीय संरक्षण दलांचं एक पथक आणि भारतीय नौदलाची दोन जहाजं देखील सहभागी होणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं आहे. सेशेल्सच्या 'नॅशनल डे'च्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला सन्माननीय अतिथी' म्हणून उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सेशेल्सच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत.

**<u>सल्ला</u>**

परराष्ट्र मंत्रालयानं भारतीय नागरिकांना संपूर्ण प्रवासासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रं मिळेपर्यंत कैलास मानसरोवर यात्रा सुरू न करण्याचा सल्ला दिला आहे. नेपाळमध्ये अडकलेल्या भारतीय यात्रेकरूंकडून खासगी प्रवासी वाहतूकदारांच्या माध्यमातून - यात्रा सुरू असताना मदतीसाठी विनंती प्राप्त झाल्यानंतर - मंत्रालयानं हा सल्ला जारी केला आहे. खासगी प्रवासी वाहतूकदारांच्या माध्यमातून कैलास मानसरोवर यात्रा करणाऱ्या काही भारतीय नागरिकांनी चीनमध्ये प्रवेश करण्यासाठी आवश्यक प्रवेश परवाना आणि व्हिसा न घेता नेपाळमध्ये प्रवास केला असं परराष्ट्र मंत्रालयानं महटलं आहे. परिणामी, अनेक यात्रेकरू अडकून पडले असून त्यांनी मंत्रालयाकडे मदत मागितली आहे. आवश्यक परवानगी मिळण्याची अपेक्षा धरून प्रवास केल्यामुळे प्रवासादरम्यान अडचणी येऊ शकतात, असं सांगत यात्रेकरूंनी प्रवासी कागदपत्रांशिवाय यात्रा सुरू करू नये असा सल्ला दिला आहे. यात्रेला जाण्यापूर्वी आपले वाहतूकदार रीतसर नोंदणीकृत आणि अधिकृत आहेत ना हे पडताळून पाहण्याचं आवाहन परराष्ट्र मंत्रालयानं सर्व यात्रेकरूंना केलं आहे.

**<u>पटेल</u>**

गेल्या 12 वर्षांत भारतानं आरोग्यसेवेच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. प्रत्येक नागरिकाला सुलभ, परवडणारी आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या 'सर्वसमावेशक आरोग्य संरक्षण' या व्यापक उद्दिष्टाच्या दिशेनं देश वाटचाल करत आहे – असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी म्हटलं आहे. एका खासगी प्रसारमाध्यमाच्या 'डॉक्टर्स डे कॉन्क्लेव्ह' कार्यक्रमात बोलताना त्यांनी 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' ही जगातील सर्वात मोठ्या

आरोग्य विमा किंवा सुरक्षितता योजनांपैकी एक असल्याचं अधोरेखित केलं; या योजनेअंतर्गत सुमारे 62 कोटी लोकांना संरक्षण दिलं जात असून, ती कुटुंबांना आर्थिक संरक्षणासह वैद्यकीय उपचार मिळवून देण्यात मदत करत आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमाद्वारे देश-विदेशातील जनतेशी संवाद साधणार आहेत. या मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा 135 वा भाग आहे.
हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, ए आय आर न्यूजची वेबसाइट आणि 'न्यूज-ऑन- ए आय आर ' या मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदीतील प्रसारणापाठोपाठ आकाशवाणीवरुन  हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्येही प्रसारित करण्यात येईल .

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन देण्यात येत आहे...**

**भूकंप**

व्हेनेझुएलामध्ये बुधवारी झालेल्या भूकंपांमुळे मृतांची संख्या 1 हजार 430 वर पोहोचली आहे. दक्षिण अमेरिकेतील या देशाला तडाखा देणाऱ्या 7 पूर्णांक 2 आणि 7 पूर्णांक 5 रिख्टर तीव्रतेच्या सलग दोन भूकंपांनंतर बचावकार्य सुरू असतानाच ही ताजी आकडेवारी आली आहे. किमान 68 हजार 900 लोक बेपत्ता असल्याची माहिती संबंधित कुटुंबियांनी दिली आहे.

दरम्यान - काल  संध्याकाळी 7 च्या सुमारास अफगाणिस्तानच्या हिंदूकुश भागात 6 पूर्णांक 2 रिख्टर तीव्रतेचा भूकंप झाला. भारत, पाकिस्तान, चीन, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान, किर्गिस्तान आणि तुर्कमेनिस्तान याशिवाय दिल्ली-एनसीआर, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि हरियाणासह उत्तर भारतातील अनेक भागांत भूकंपाचे धक्के जाणवले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राचे शास्त्रज्ञ संजय कुमार प्रजापती यांनी हा भूकंप मध्यम तीव्रतेचा असून यामुळे फारसं नुकसान होण्याची शक्यता नसल्याचं आकाशवाणीला सांगितलं.

**अमेरिका-इराण**

अल्पकाळ टिकलेल्या युद्धविरामानंतर पुन्हा एकदा तणाव निर्माण झाल्यामुळे, राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार अमेरिकेच्या लष्करानं सलग दुसऱ्या दिवशी इराणमधील अनेक ठिकाणांवर हल्ले केले. शुक्रवारी एका व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, अमेरिकेच्या लष्करी विमानांनी इराणची लष्करी पाळत ठेवण्याची यंत्रणा, दळणवळण प्रणाली, हवाई संरक्षण केंद्रं, ड्रोन साठवणूक केंद्रं आणि सुरुंग पेरण्याची क्षमता असलेल्या यंत्रणांना लक्ष्य केलं, अशी माहिती 'यूएस सेंट्रल कमांड'नं समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे दिली.

**शिकवणी**

सुरक्षिततेच्या अनिवार्य नियमांचं पालन न करणाऱ्या शिकवणी वर्गांना दिल्लीत यापुढे  कामकाज करण्याची परवानगी दिली जाणार नाही असा इशारा दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिला आहे. एका व्हिडिओ संदेशात गुप्ता यांनी सांगितलं की, अधिक कडक देखरेख, वाढीव उत्तरदायित्व आणि विद्यार्थ्यांची अधिक चांगली सुरक्षितता निश्चित करण्यासाठी दिल्ली सरकार लवकरच एक भक्कम नियामक कायदा आणणार आहे.

**तपास**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रश्नपत्रिका-फुटी प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. ठाण्याचे सहपोलीस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या नेतृत्वाखाली हे पथक काम करेल. नियोजित TET परीक्षेच्या आदल्या दिवशी भिवंडी पोलिसांनी या प्रकरणामधील तीन संशयित सदस्यांना अटक करून प्रश्नपत्रिका-फुटीचा मोठा कट उधळून लावल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं आज होणारी TET परीक्षा पुढे ढकलली आहे. परीक्षेची सुधारित तारीख नंतर जाहीर केली जाईल.

**कर्करोग/टाटा**

कर्करोग रुग्णांना उपचाराच्या संपूर्ण प्रक्रियेत योग्य मार्गदर्शन, समन्वय आणि सहाय्य मिळावं या उद्देशानं टाटा मेमोरियल सेंटर आणि ईको इंडिया यांच्याद्वारे ऑनलाइन रुग्ण दिशादर्शन प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला असून याचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला. आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये कर्करोग रुग्णांच्या उपचार प्रक्रियेतील समन्वय, प्रभावी संवाद, मार्गदर्शन आणि आवश्यक सहाय्य याबाबत विशेष कौशल्य या प्रशिक्षणातून विकसित करण्यात आलं. आता पश्चिम बंगाल आणि गुजरात राज्यांमध्येही हे प्रशिक्षण दिलं जाणार असून, देशभरात रुग्ण-केंद्रित कर्करोग सेवा अधिक सक्षम आणि प्रभावी करण्याचा याचा उद्देश आहे.

**महिला टी-20 विश्वचषक - क्रिकेट**

आयसीसी महिला टी-20 विश्वचषकात, आज लंडनच्या लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर 'गट अ' मधील आपल्या अखेरच्या सामन्यात भारताचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी सात वाजता सुरु होईल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं आतापर्यंत खेळलेल्या चारपैकी तीन सामने जिंकले असून, त्या 'गट अ'च्या गुणतालिकेत सध्या दुसऱ्या स्थानावर आहे. दुसरीकडे, ऑस्ट्रेलियानं खेळलेल्या चारही सामन्यांत विजय मिळवून गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावलं आहे. उपांत्य फेरीतील आपलं स्थान निश्चित करण्यासाठी, अद्याप एकही सामना न हरलेल्या ऑस्ट्रेलियावर विजय मिळवण्याचं उद्दिष्ट भारतासमोर आहे .

**ग्रँडमास्टर**

गोव्याचा 14 वर्षीय आंतरराष्ट्रीय मास्टर इथन वाझ हा बोस्निया आणि हर्जेगोविना येथील 'सारायेवो जीएम मिक्स' स्पर्धेत आपला तिसरा आणि अंतिम ग्रँडमास्टर नॉर्म पूर्ण करून भारताचा 96 वा बुद्धिबळ ग्रँडमास्टर ठरला आहे.

**फिफा**

फिफा विश्वचषकात, आज सकाळी अमेरिकेतील न्यू जर्सी स्टेडियमवर झालेल्या 'गट एल' मधील सामन्यात इंग्लंडने पनामाचा 2-0 असा पराभव केला. ज्यूड बेलिंगहॅम आणि हॅरी केन यांनी प्रत्येकी एक गोल केला आणि या विजयासह इंग्लंडने 'गट एल'मध्ये अव्वल स्थान निश्चित केलं .

**IMD-हवामान**

आज आसाम, मेघालय, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये 'अति मुसळधार' ते 'अत्यंत मुसळधार' पावसाचा इशारा दिला आहे. पुढील दोन दिवसांत बिहार, छत्तीसगड, कर्नाटक, कोकण, गोवा, ओडिशा, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, तेलंगणा, विदर्भ, लक्षद्वीप आणि अंदमान-निकोबार बेटांवर मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

आंध्र प्रदेश, पूर्व राजस्थान, पूर्व उत्तर प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात उद्यापर्यंत विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळी पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.